
दिवाळी
२०२५
www.agrowon.com
सकाळ
मित्र
ग्लोबल
शिवाराचा...
अ‍ॅग्रोवन
सुखाची
शेती
किंमत २०० रुपये



संगमेश्वर तालुक्यात फुणगुस गावच्या जंगलमय डोंगरावर वसलेले आनंदाचं शेत व परिसर.

## आनंदाचं शेत?

# हे तर धरतीवरचे नंदनवन

कोकणात संगमेश्वर तालुक्यातील (जि. रत्नागिरी) घनदाट जंगलात वसलेल्या फुणगुस गावच्या डोंगरावर राहुल व संपदा या कुळकर्णी दांपत्याने बावीस एकरांत 'आनंदाचं शेत' उभारले आहे. एकेकाळी ग्लॅमरस अभिनय- कला क्षेत्रातील हे सेलिब्रिटी दांपत्य आज शेतीतील सेलिब्रिटी झाले असून  समाधानी, शांत जीवनाचा अनुभव घेत आहे. घरासाठी लागणाऱ्या रोजच्या विविध अन्नाची गरज शेतीतूनच पूर्ण होत आहे.  शेतीला कृषी पर्यटनाची जोड देत लोकांना आपल्याशी जोडत पर्यावरण, जैवविविधतेचे संवर्धन केले आहे. आर्थिक श्रीमंतीपेक्षा शेती- निसर्गमय जीवनाचा आनंद, त्यातील समृद्धी हेच आमच्या जीवनाचे सर्वस्व असल्याची भावना या दांपत्याने व्यक्त केली आहे.

मंदार मुंडले

निसर्गानं अक्षरशः सर्वस्व ओतून कोकणच्या पदरात सौंदर्याचे भरभरून दान टाकले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुका त्यापैकीच आहे. तालुक्यातील घनदाट जंगलात फुणगुस हे चिमुकले गाव वसले आहे. याच फुणगुसच्या डोंगरावर समुद्रसपाटीपासून सुमारे सातशे फूट उंचीवर आपल्या २० ते २२ एकरांत आनंदाचं शेत, अर्थात 'फार्म ऑफ हॅपीनेस' मोठ्या दिमाखाने, अभिमानाने मिरवत आहे. शेतकरी, पर्यावरणवादी, पर्यटक, शहरी ग्राहक, विद्यार्थी, शेती-निसर्गाचे अभ्यासक अशा सर्वांसाठी हे आनंदाचं शेत प्रेरणेचा अखंड स्रोत ठरणारे आहे. जीवनाचे खरे मर्म उलगडून दाखवणारे ते महास्तोत्र म्हटल्यासही वावगे ठरणार नाही. राहुल आणि संपदा हे कुळकर्णी दांपत्य या शेताचे कर्ते- करविते अर्थात शिल्पकार आहेत.

संपदा जोगळेकर-कुळकर्णी हे नाव महाराष्ट्राला परिचित आहे ते कसदार अभिनयामुळे. ठाणे शहरातील जन्म, मुंबई विद्यापीठातून एमएच्या पदवीधर, भारतीय शास्त्रीय नृत्यांगना, रंगभूमी, चित्रपट, टीव्ही मालिकेतील गुणी अभिनेत्री, निवेदिका असे त्यांचे बहुआयामी प्रतिभावंत व्यक्तिमत्त्व आहे. ऑल दि बेस्ट, किमयागार, आईचं घर उन्हाचं या गाजलेल्या कलाकृतींपैकी निवडक सांगता येतील. चाळीस मालिका, १८ नाटकांमधून अभिनय, सहा मराठी नाटकांचे दिग्दर्शन, तीन मराठी नाटकांचे लेखन असा सुमारे तीस वर्षांचा यशस्वी प्रवास आहे. दूरदर्शनवरील ताक धिना धिन कार्यक्रमाचे निवेदन करण्याची संधी त्यांना मिळाली आणि त्यांच्या कारकिर्दीला वेगळे वळण मिळाले. त्यांच्या प्रसन्न, सोज्वळ आणि हजरजबाबी निवेदनशैलीमुळे त्यांनी रसिकांच्या मनात घर केले. ठाण्यातच लहानाचे मोठे झालेले त्यांचे पती राहुल जे जे स्कूल ऑफ आर्टचे पदवीधर. जाहिरात क्षेत्रातील नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांसोबत काम करताना 'व्हिज्युलायझर' ते 'क्रिएटिव्ह डायरेक्टर' असा त्यांना वीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे, अनेक जाहिरात संकल्पनांच्या निर्मितीसह 'एडिटिंग, आर्ट, डिझाइन या विषयात त्यांची मास्टरी आहे.



फुणगुसच्या आपल्या आनंदाच्या शेतात रमलेले
राहुल व संपदा हे कुळकर्णी दांपत्य.

## झगमगत्या कला क्षेत्रातून गावाकडे प्रवास

राहुल आणि संपदा काही वर्षांपूर्वीपर्यंत मुंबईत आपापल्या क्षेत्रातील करिअरमध्ये व्यग्र होते. वार्षिक उत्पन्न कित्येक लाखांच्या घरात होतं. आर्थिक सुबत्ता होती. कशाला काही कमी नव्हतं. उत्तम घर, दोन फोर व्हीलर्स, महागडे मोबाइल्स, मुलीला उत्तम शिक्षण, कपडे, हवं ते शॉपिंग, चांगलंचुंगलं खाणं... सगळं हाताशी होतं. पण एक वेळ अशी आली, की या साऱ्या गोष्टींशिवाय आपल्या आयुष्यात काय आहे, असा विचार मनात रुंजी घालू लागला. पैशाला पैसा जोडत आपण फक्त धावतोय. हा वेग आता सहन करण्यापलीकडचा आहे, एकमेकांना वेळ देणंही शक्य होत नाहीए. बस्स! याच क्षणाला राहुल यांनी निर्णय घेतला. हे करिअर, हे महानगर सोडायचं. दऱ्याखोऱ्यांत वसलेल्या आपल्या निसर्गरम्य फुणगुस गावात जायचं, कृषी पर्यटन केंद्र सुरू करायचं. पूर्वज, घर- शेतीवाडी याच गावात होती. इथल्या घराला कुलूप कधीच लागलं नाही. ते कायमच राहतं राहिलं, असं राहुल अभिमानाने सांगतात. संपदा यांनीही अजिबात आढेवेढे न घेता आपल्या जोडीदाराच्या निर्णयाला रुकार दर्शवला.

## आर्थिक श्रीमंतीपेक्षा समृद्धीला महत्त्व

झगमगत्या कलाक्षेत्रातील यशस्वी करिअर सोडून गावी पर्यटन केंद्र वसवण्याचा निर्णय घेतला खरा. परंतु ही वाट अत्यंत आव्हानात्मक, खडतर होती. त्या वेळी एसआरटी भातशेती तंत्राचे जनक शेखरदादा भडसावळे यांच्या रायगड जिल्ह्यातील सगुणा बागेला भेट देण्याचा योग आला. त्या वेळी दादांनी त्यांना व्यवसायाचा नव्हे, तर जीवनाचा महत्त्वाचा मंत्र देत भावी आयुष्याची वाट दाखवली. ते म्हणाले, की कृषी पर्यटन वगैरे ठीक आहे. त्यापेक्षा महत्त्वाचं म्हणजे सुशिक्षित, सक्षम असलेल्या तुम्ही दोघांनी शेती केली पाहिजे. भविष्यात अन्नसुरक्षेचं संकट तयार होणार आहे. अन्नभान तुम्हाला येणं गरजेचं आहे. त्याच दरम्यान दक्षिणेकडे फिरताना 'होम स्टे' पाहण्यात आलं. आपलंच घर, आपण त्यात राहताना त्यातील दोन- चार खोल्या पर्यटकांनाही द्यायच्या ही संकल्पना आवडली. हाच विचार पक्का झाला. समजा होम स्टे संकल्पना नाही चालली, तरी आपलं घर तरी कुठे जाणार नाही. शेतीही आनंदानं कसत राहू. आपल्याला आर्थिक श्रीमंती नको, समृद्धी, समाधान हवे आहे. शेती व पर्यटन यांच्या संगमातूनच जे हवे ते प्राप्त होईल. याच विचारमंथनातून २००३ पासून मूर्त रूप येऊ लागलं.

## समुद्राशिवायचे कोकण समजले

राहुल- संपदा यांनी आता शेतीतील विज्ञान, कौशल्य, बाजारपेठ यांत कौशल्य मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. आर्थिक गुंतवणुकीचं नियोजन केलं. संपदा सांगतात, की केवळ नाटक प्रयोगांच्या माध्यमातून कोकण चिपळूणपर्यंतच माहीत होतं. परंतु लग्नानंतर संगमेश्वर तालुका, सासरचं घर, दीर करीत असलेली शेती, कुळाचार या बाबी ज्ञात होऊ लागल्या. कोकण म्हणजे समुद्र एवढंच पूर्वी माहीत होतं. समुद्राशिवायचं दऱ्या-खोऱ्यांमधलं कोकण आता खऱ्या अर्थानं समजू लागलं. सुरुवातीच्या काळात राहुल यांनी मुंबई ते फुणगुस असा दर आठवड्याला फेऱ्या मारण्याचे कष्ट उपसले. सोमवार ते शुक्रवार नोकरी आणि सुट्टीचे दोन दिवस गावी शेती असा त्यांचा नित्यक्रम ठरून गेला होता. कुटुंबाची मुख्य आर्थिक जबाबदारी त्यांच्यावर होती. संपदा यांनीही आपलं काम वाढवून जोडीदाराचा आर्थिक ताण कमी करण्याचा प्रयत्न केला. अखेर पूर्णवेळ गावी राहिल्याशिवाय शेतीचा विकास शक्य नाही हे उमगल्यावर दांपत्यानं महानगर सोडलं. आणि फुणगुसचा डोंगर हेच मग कायमस्वरूपी निवास होऊन गेलं.



आनंदाच्या शेतामुळे अनेक स्थानिकांना शाश्वत रोजगार मिळाला आहे.

## कष्टाचं रोप वाढविण्यास सुरुवात

इथली जमीन म्हणजे जांभ्या दगडाचा पूर्ण कातळ होता. मातीची धूप व्हायची. अशात विविध पिके घ्यायचं मोठं आव्हान होतं. सगळा गवताळ कुरणांचा पट्टा होता. उन्हाळ्यात त्याला वणवे लागायचे. मण्यार, फुरसे असे विषारी साप, विंचू, रानडुक्कर, बिबटे होते. परंतु या सर्वांना संकटे न मानता सहजीवन मानले. संपदा सांगतात, की शेंडी तुटो वा पारंबी आता शेतीपासून दूर जाणे नाही. ज्याच्यावर निस्सीम प्रेम केलं त्या जोडीदारासोबत फक्त आनंदी राहायचं हेच पक्कं केलं. आपली कार कोणती, आपण कोणकोणत्या ब्रॅण्डच्या वस्तू वापरतो हे आपलं प्रतिबिंब कधीच असता कामा नये. या उलट आपण मनापासून आणि प्रामाणिक कष्ट करतो आहोत का, त्याच कष्टाचं रोप वाढतंय का एवढ्यावरच लक्ष दिलं, असं संपदा सांगतात.

## ज्ञानासोबत मैत्री

जागतिक नैसर्गिक शेतीचे पितामह फुकुओका ही प्रेरणा ठरली. त्यांच्यासह प्रतापराव चिपळूणकर, रॅचेल कार्सन तसेच मान्यवर लेखकांच्या पुस्तकांसोबत घट्ट मैत्री झाली. 'ॲग्रोवन'मधील शेतकऱ्यांच्या यशकथा वाचून राहुल त्यांना संपर्क करीत. त्यांच्या शेतांना भेटी देत. त्यांच्याकडून बियाणे आणत. स्थानिकांकडूनही अनेक गोष्टी शिकून घेतल्या, आता कुळकर्णी दांपत्य वर्षातील विविध हंगामांत विविध पिकांचे प्रयोग करण्यात रमू लागले. एकेकाळी आपल्या चतुरस्र अभिनयाने विविध पात्रे जिवंत करणाऱ्या संपदा खऱ्याखुऱ्या आयुष्यात शेतकरी हे पात्र जगू लागल्या. त्याला तेवढीच समर्थ साथ मिळाली ती शेतकरी धनी झालेल्या राहुल यांची. फुणगुसच्या डोंगरात शहरातल्या प्रमाणे सिमेंट काँक्रीटची वास्तू असता कामा नये असे ठरवले होते. त्यानुसार २००७ ते २०१४ या कालावधीत राहुल यांनी वास्तुविशारदांचे मार्गदर्शन व स्वबुद्धिकौशल्य पणास लावले. त्यातून साकारले जांभ्या चिऱ्यातील अस्सल कोकणी बाजाचे कौलारू, देखणे प्रशस्त घर. त्यात पर्यटकांसाठी सहा आरामदायी खोल्या. त्याला सोनचाफा, बकुळ अशी नावं. शेणानं सारवलेली जमीन. राहुल-संपदा याच घरात राहतात. अंगणात दगडात कोरलेलं शिल्प, जुने लाकडी फर्निचर, स्वयंपाकघरातील जुन्या काळातील भांडी, अप्रतिम प्रकाशव्यवस्था, पुस्तकांचे शेल्फ, पुरस्कारांनी भरलेले डेस्क. नांगर, बैलगाडी आदी प्रतिकृती, वास्तूला चोहोबाजूंनी वेढलेली झाडे, आमराई... 'आनंदाचं शेत' या नावाप्रमाणे इथे चोवीस तास/बारा महिने आनंद नांदत असतो. पर्यटकांचं स्वागत सोनटक्क्याचं आणि रानफूल देऊन केलं जातं.

## फार्म टूरचा जिवंत अनुभव

राहुल सांगतात, की पर्यटकांना आम्ही फार्म टूरचा तीन दिवसांचा प्रत्यक्ष अनुभव देतो. त्यांना शेती, अन्नसुरक्षेचे महत्त्व, अन्ननिर्मितीची प्रक्रिया, अन्नभान या बाबी सविस्तर सांगतो. भातलावणी, गोठा साफ करणे, अवजारे चालवणे अशा विविध कामांची संधी पर्यटकांना मिळते. पक्षिनिरीक्षण असते. नाश्त्याचं, जेवणाचं ताट घरच्या शेतातील पदार्थांनीच परिपूर्ण असते. त्यात लाल भात, नाचणीची किंवा तांदळाची भाकरी, कोकणातील भाज्या, डाळी, लोणची, ओवा, कढीपत्त्याची किंवा ओव्याची भजी, कोकम, दूध तूप, खीर, श्रीखंड अशी उत्तम कोकणी स्वादाची व्यंजने असतात. ताटात केळीचं पान, त्यावर पापड, त्यावर लाल तांदळाचा गरम गरम पौष्टिक भात, त्यावर लोणकढी तूप, मेतकुट अशा प्रकारे ताट सजविण्यामध्येही कुळकर्णी दांपत्यानं आपल्यातील कलागुणांचा केलेला पुरेपूर वापर प्रत्ययास







सोनपळ या देशी लाल तांदळासह फळबाग लागवड. (इन्सेटमध्ये) रोजचे संपूर्ण अन्न घरच्या शेतातच पिकते.

येतो. आमच्या इथे रेनडान्ससारखे प्रकार कधीच पाहायला मिळणार नाहीत असे राहुल आवर्जून सांगतात.

## शेतीत झाले सेलिब्रिटी

आज शेती सुरू करून १८ वर्षे, तर पर्यटन व्यवसायाला १२ वर्षे पूर्ण केली आहेत. एकेकाळी ग्लॅमरस अभिनय- कला क्षेत्रात सेलिब्रिटी असलेले हे दांपत्य आज शेतीतील सेलिब्रिटी झाले आहे. आजमितीला २२ एकरांतील सुमारे सहा एकर क्षेत्र लागवडीखाली आहे. त्यात चाळीसहून अधिक प्रकारची पिके किंवा वाण फळबागांच्या सान्निध्यात किंवा मोकळ्या थोड्या थोड्या क्षेत्रात मिश्र किंवा आंतरपिके पद्धतीने बहरली आहेत. देशी लाल तांदळासह तृणधान्ये, कडधान्ये, वरी, नाचणीसारखी भरडधान्ये, कारळ्यासारखे तेलवर्गीय, कंदवर्गीय, पालेभाज्या, फळभाज्या, रानभाज्या, वनौषधी, करवंद, तोरण फळे आदी रानमेवा, आंबा, काजू, फणसासह विविध फळपिके अशी भरपूर समृद्धी आहे. त्यातून घरच्या सर्व प्रकारच्या अन्नाची गरज पूर्ण होते. उपलब्धतेनुसार विक्रीही होते. आंबा, काजू किंवा अन्य कोणतंही एकच एक पीक सलग मोठ्या पट्ट्यात घ्यायचं आणि त्यातून अर्थार्जन करायचं ही पद्धत इथे नाही. हळद पावडर, कुळीथ, नाचणीचे पीठ, कैरी, लिंबू आदींचे लोणचे, कोकम आगळ, आमसूल अशा अनेकविध पदार्थांच्या माध्यमातून प्रक्रियेसही चालना दिली आहे. पर्यटकही इथून जाताना विविध पदार्थ सोबत घेऊन जातात.

## देशीवाण व खाद्य संस्कृतीचे संवर्धन

राहुल- संपदा दांपत्याने देशी वाण व त्याला अनुषंगून खाद्य संस्कृतीची जोपासना केली आहे. राहुल सांगतात, की विविध पिकांचे अनेक दुर्मीळ देशी, जंगली वाण आम्ही जोपासले आहेत. सोनपळ नावाचा देशी लाल तांदूळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. त्याची लागवड आम्ही करतो. भले त्याची उत्पादकता सुधारित वाणांपेक्षा कमी असेल. पण आमच्यासाठी हे महत्त्वाचे आहे, की त्याचा दाणा जाड आहे. तो पौष्टिक, रुचकर आहे. हापूस आंब्याच्या जोडीला कैरीच्या लोणच्याचे आंबे आहेत. काजूचे देशी वाण आहे. कापा, बरका, नीरफणस आहे. केवळ भाजीसाठीची केळी आहे. लोणच्यासाठी आंबेहळद आहे. भोकराचे लोणचे केले जाते. भारंगी रानभाजी, कारळा व सुरण यांच्या हिरव्या कोवळ्या पानांची भाजी उत्तम होते. रानकेळीच्या खोडाच्या आतील गाभ्याचे बारीक काप करून भेळ तयार केली जाते. अशा कित्येक वनस्पतींच्या विविध भागांचा वापर करून नावीन्यपूर्ण पौष्टिक रेसिपी तयार करणे व त्या आपल्या रोजच्या आहारात असणे हीच जगण्याची खरी गंमत असल्याचे राहुल- संपदा सांगतात.

## पुढच्या पिढीवर संस्कार

राहुल- संपदा दांपत्याची विवाहित मुलगी शर्वरी टीव्ही मालिका. चित्रपटाच्या माध्यमातून अभिनय व दिग्दर्शन क्षेत्रात मुंबईत कार्यरत आहे. आई-वडिलांचे केवळ कला- अभिनयाचेच नव्हेत, तर शेती- निसर्गाचे संस्कारही तिच्यावर नकळत झाले आहेत. आपली शेती, पिके, त्यांची वाणनिहाय वैशिष्ट्ये, आई- बाबांचे कष्ट यांची इत्थंभूत माहिती व जाण तिला आहे. तिचेही इथे शेत आहे. मुंबईहून मुद्दाम वेळ काढून ती इथे सातत्याने येत असते. आपल्या शेतात कोणतीही चुकीची गोष्ट होऊ नये, याचे भान तिला आहे. आपण आपल्याच घरी पिकविलेले अन्न खातो याचे शर्वरीला समाधान आहे. दिवाळी गिफ्ट देण्याची तिला सवय आहे. परंतु आता या गिफ्टचे स्वरूप बदलले आहे. घरचा तांदूळ, फळं, भाज्या या गोष्टी शर्वरीच्या गिफ्टमध्ये समाविष्ट झाल्याचे तिच्या आईला विलक्षण कौतुक आहे.



समर कॅम्पमध्ये काजूगर काढण्याचा आनंद मुले लुटतात.

## पर्यावरण, जैवविविधतेचे संवर्धन

कुळकर्णी दांपत्य केवळ शेती व पर्यटन व्यवसायापुरते मर्यादित राहिलेले नाही. तर सेंद्रिय- नैसर्गिक शेती पद्धतीच्या आचरणातून आरोग्यदायी अन्ननिर्मितीसह पर्यावरण, मातीचे संरक्षण केले आहे. दुर्मीळ पक्ष्यांचा अधिवास वाढवला आहे. कळक, माणगा, गोल्डन आदी जातींची बांबू लागवड आहे. हेच बांबू मुलीच्या लग्नासाठी मांडव तयार करण्यासाठी उपयोगात आले. विविध वृक्षांच्या माध्यमातून जैवविविधता टिकवली आहे. पिकांव्यतिरिक्त क्षेत्र गवताळ कुरणांसाठी राखीव ठेवले आहे. त्यातून कातळ जमिनीत मोठ्या प्रमाणात जलसंवर्धन होते. शिवाय जनावरांसाठी मुबलक चारा उपलब्ध होतो. सुमारे १४ पर्यंत देशी गाई व म्हशींचे पालन केले आहे. दोन स्वतंत्र तंत्रज्ञानावर आधारित दोन बायोगॅस युनिट्स उभारून दररोजच्या स्वयंपाकासाठीचे इंधन तयार केले आहे. त्यातून सिलिंडरची गरज कमी केली आहे.

## तीन गावांत रोजगार

आनंदाच्या या शेतीनं फुणगुस परिसरातील तीन गावांतील सुमारे वीस जणांना रोजगार दिल्याचे समाधान राहुल व्यक्त करतात. हे लोक शेतात राबण्यासह पर्यटन केंद्रातील कामे, स्वयंपाकातही हातभार लावतात. इथल्या देखण्या वास्तुच्या उभारणीसाठी याच लोकांचे हात लागले आहेत सर्व जण एकमेकांच्या जबाबदाऱ्या आलटून पालटून अंगावर घेतात. त्यामुळे एखाद्याच्या अनुपस्थितीत काम अडून राहत नाही. अवजारे, यंत्रे, विजेच्या उपकरणांची दुरुस्ती आदी कामांत राहुल आणि हीच मंडळी तरबेज झाली आहेत.

## सर्जनशील जीवनाची अनुभूती

सच्चे, गुणी कलाकार असलेल्या या दांपत्याने कला, सर्जनशीलतेची अनुभूती फुणगुसच्या शेतातही जोपासली आहे. लोक जोडत राहणे हा त्यांचा आवडता छंद आहे. म्हणूनच पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. संपदा म्हणतात, की शेती- पर्यटनाच्या निमित्ताने वेगवेगळ्या स्वभावृत्तीच्या, वयोगटातील लोकांबरोबर वेळ रमवता येतो. त्यांच्यासोबत गप्पा मारता येतात. म्हणूनच आनंदाचं शेत टिकू शकलं. मला व्यक्त व्हायला आवडतं. आज अभिनयाला काही काळ विश्रांती मिळाली असेल. पण कविता, लेखन, निवेदन, नृत्य दिग्दर्शन या सर्जनशील गोष्टी सुरूच असल्याचे संपदा सांगतात. वजनदार या त्यांनी लेखन केलेल्या अलका कुबल अभिनित नाटकाचे प्रयोग सुरू आहेत. सोनिया परचुरे यांच्यासाठी नृत्यविषयक कलाकृतीसाठी स्क्रिप्ट लिहिले आहे. कथासंग्रह, ललित लेख, बाबीस उद्योजकांच्या मुलाखती आदी स्वरूपात सहा- सात पुस्तके लिहून झाली आहेत. राहुल यांनीही बासरी वादनाचा छंद जपला आहे. हा सर्व व्याप शेती सांभाळून केला जातो.

## आव्हानेच जिवंत ठेवतात

संपदा सांगतात, की मध्यंतरी एका नाटकात काम करताना म्हणता म्हणता २५ प्रयोग कधी झाले ते कळलच नाही. पण त्यानंतर ठरवलं की आता यापुढे हे बास. शेतीकडे दुर्लक्ष करून आपल्याला काहीच करायचं नाही. शेतीनं माझ्यात घडविलेला बदल म्हणजे पूर्वी कला क्षेत्रात इतरांना भेटण्यासाठी जावे लागे. आता कानाकोपऱ्यातून भेटायला लोक इथे येतात ही अनुभूती वेगळीच आहे. आमच्या बावीस एकरांत केवळ सहा खोल्या बांधून थांबलो आहोत. मनात आणलं तर पन्नासहून अधिक निवासी झोपड्याही (हट्स) बांधू शकलो असतो. पण आम्हाला जगण्याचं समाधान अनुभवायचं आहे. एका क्षेत्रातील माध्यमातून सुटून दुसऱ्या क्षेत्रात पैसा कमाविण्यासाठी आम्ही शेतीत आलेलो नाही. अंगणात पक्षी आले, त्यांची कुठल्या झाडांवर घरटी पाहिली, तीन दिवस कमळ फुललं, वरईला ओंबी फुटली, कुठे अंकुर फुटला अशा छोट्या छोट्या गोष्टीत आम्ही आनंदाचे क्षण वेचतो. इथे आम्हाला समस्या काही कमी नाहीत. शहारातील घरी वीज, पाणी,

स्वच्छता अशा विविध गोष्टींसाठी निवासी सोसायट्यांचे पदाधिकारी कार्यरत असतात. इथे आमचे दुखणे, पुसणे आमचे आम्हालाच पाहावे लागते. पण ही रोजची आव्हानेच आम्हाला जिवंत ठेवतात. आमचा व्यवसाय उत्तम चालला आहे. पण समाजाचेही आपण काही देणे लागतो ही भावनाही जपणं महत्त्वाचं असतं. आमच्या दोन्ही वाहनांचा उपयोग इथल्या ग्रामस्थांना कसा होईल ते पाहतो. आपण दुसऱ्यांची ॲम्ब्युलन्स, रिक्षा झालो पाहिजे हीच आमची भावना असते. आमच्या कामगारांनाही घरच्यांसारखे सांभाळतो. त्यांच्या समस्या सुख,दुःखात भाग घेतो.

## ग्राहकांमध्ये जागृती

राहुल- संपदा यांनी शेती, शेतकरी व निसर्गाबाबत शहरी लोकांमध्ये जाणीव जागृती करण्याचे महत्त्वाचे पाऊलही उचलले आहे. त्या दृष्टीने इथे वर्षभरात विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्यातील एक म्हणजे दहा ते पंधरा वर्षे वयोगटातील मुलांसाठी तीन दिवसांचा समर कॅम्प असतो. त्यातून शेती-निसर्गातील विविध प्रात्यक्षिके, खेळ, गोठ्यात काम करण्याचा अनुभव देण्यात येतो. आपल्या अन्नाचे ताट स्वच्छ करणे म्हणजे त्यात भाताचे एक शीतही न ठेवण्याचे संस्कार त्यांच्यावर केले जातात. कारण हे शीत पिकविण्याची किंमत त्या मुलांना कळली पाहिजे असा दांपत्याचा अट्टहास असतो. कलामोहोर नावाने एप्रिल- मेच्या दरम्यान उपक्रम असतो. त्यात संगीत, बासरी, शिल्प आदी क्षेत्रांतील प्रसिद्ध कलाकार तीन दिवस मुक्काम करतात.



कलात्मक पद्धतीने पर्यटन स्थळाचे सौंदर्य वाढविले आहे.

निसर्गरम्य वातावरणात पर्यटक त्यांच्यासोबत मनमुराद संवाद साधतात. कलेचा आनंद लुटतात. एका कार्यक्रमात प्रसिद्ध गायक- संगीतकार कौशल इमानदार यांना अनुभवण्याची संधी पर्यटकांना मिळाली. अशा उपक्रमांना लोकांचा भरभरून प्रतिसाद लाभतो. तिसरा उपक्रम म्हणजे पाऊसभेट. फक्त महिलांसाठी ही तीन दिवसांची फार्म टूर असते. ठाणे, पुणे शहरांतून त्यांना थेट या ठिकाणी आणणे व परत नेण्याची व्यवस्था केली जाते. शहरांकडून पुन्हा गावी शेती करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी 'बॅक टू फार्मिंग' हा तीनदिवसीय ऑनलाइन अभ्यासक्रम घेण्यात येतो. त्याचे शेतात प्रात्यक्षिकही देण्यात येते.



## लाभलेले सन्मान

राहुल- संपदा दांपत्याला विविध प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. यात आउटलुक रिस्पॉन्सिबल टुरिझम इंडिया, आयआयपीटीआय, उद्योग भूषण, महिला उद्योजक आदींचा समावेश आहे. नैसर्गिक शेतीतील प्रयोगशील तज्ज्ञ शेतकरी राजेंद्र भट आदी मान्यवरांनी येथे भेटी दिल्या आहेत. शेखरदादा भडसावळे यांच्या हस्ते आनंदाचं शेत या केंद्राचे उद्घाटन झाले आहे. त्यांच्या मार्गदर्शनपर कार्यक्रमात दांपत्याच्या प्रयोगांविषयी भाष्य असते. अशा व्यक्तींचे सदैव असलेले मार्गदर्शन व पाठबळ पुरस्कारांपेक्षाही मोलाचे आहे. प्रसंगी आमचे कान पिळण्याचाही त्यांना हक्क आहे, असे राहुल- संपदा नम्रपणे कबूल करतात. अनेक ठिकाणी मार्गदर्शनासाठी या दांपत्याला आमंत्रितही केले जाते. परंतु प्रसिद्धीच्या झोतात राहण्यापेक्षा शेतीतच अधिकाधिक वेळ रमण्याला ते पसंती देतात.



मंदार मुंडले

लेखक दैनिक ॲग्रोवनचे
उपमुख्य उपसंपादक आहेत.
९८८१३०७२९४

राहुल कुळकर्णी
७६२०७७५५२१